दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८२ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.३ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## ठाकरे गटाच्या घराला दरवाजेच राहिले नाही
# सर्व नेते दरवाजे तोडून पळाले, राऊतांनी पक्ष संपवला-संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या घराला आता दरवाजेच राहिले नाही. ते दरवाजे तोडून सर्व नेते त्यांच्या घरातून बाहेर पडले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे परत कोणी जाण्याचा प्रश्नच येत नसल्याचा दावा शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटातील खासदार संजय राऊत हे स्वतःच गद्दार आहेत. त्यामुळे गद्दार कोण? हे ठरवण्याचा त्यांना अधिकार नाही. संजय राऊत यांनीच पक्ष संपवला असल्याचा घणाघाती आरोप संजय शिरसाट यांनी केला आहे. महायुतीमध्ये कोणत्याही प्रकारचे भांडणे किंवा तक्रारी नाहीत. आमच्यात संघर्ष नाही तर चर्चा सुरू असून लवकरच सर्व उमेदवारांची घोषणा होणार असल्याचे संजय शिरासट यांनी सांगितले आहे. महाविकास आघाडी यांनी आमच्या कितीतरी दिवस आधी वाटाघाटी सुरू केल्या होत्या. मात्र, त्यांचा अद्यापही निर्णय झालेला नाही. त्यांनी सुरूवात केली ज्याच जागेवर असल्याचा दावा संजय शिरसाट यांनी केला आहे. वंचित बहुजन आघाडी आता महायुती सोबत जाईल, अशी शक्यता नाही. त्यामुळे महाआघाडीत सर्व काही आलबेल नसल्याचा दावा त्यांनी केला.नारायण राणे यांच्या उमेदवारीवरून देखील आमदार संजय शिरसाट यांनी आपले मत व्यक्त केले. नारायण राणे हे प्रचाराला सुरुवात करत असले तरी देखील याबाबतचा अंतिम निर्णय हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अधिकार असल्याचे आमदार संजय



शिरसाट यांनी म्हटले आहे. रत्नागिरी सिंधुदुर्गच्या जागेसाठी आमचा आग्रह कायम असल्याचा दावा देखील त्यांनी केला. शिवसेनेचा दावा अजूनही त्या जागेवर आहे. आम्हाला अपेक्षा आहे की, त्या जागेवर शिवसेनेचा उमेदवार दिला जाईल. मात्र, तरी देखील वरिष्ठ नेते जो निर्णय घेईल तो आम्हाला सर्वांना मान्य असेल, असे आमदार संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

महादेव जानकर यांना परभणीची जागा देण्याच्या संदर्भात सर्व पक्षी नेत्यांनी निर्णय घेतला आहे. ती जागा महादेव जानकर यांना देण्यासाठीच राष्ट्रवादीकडे देण्यात आली आहे. इतर कोणत्याही जागेचा दावा शिवसेनेने सोडलेला नसल्याचे आमदार शिरसाट यांनी सांगितले आहे.हेमंत गोडसे यांनी नाशिक लोकसभा मतदारसंघात दोन वेळा विजय मिळाला आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघ ही शिवसेनेची पारंपारिक जागा आहे. त्यामुळे आम्ही त्याबाबत आग्रही होतो, आहे आणि राहणार आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघाची जागा शिवसेनेचीच आहे आणि ती शिवसेनेला मिळेल अशी आम्हाला आशा असल्याचा दावा आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे.कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवाराची घोषणा झाली आहे. त्यामुळे त्या जागे संदर्भातली चर्चा करण्याचा विषय येत नाही. ती जागा शिवसेनेची जागा आहे, त्या जागेवर शिवसेना उमेदवारच निवडणूक लढवणार असून त्या संदर्भात उमेदवाराच्या नावाची घोषणा देखील झाली असल्याचे आमदार संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

## आगरगाव पारधीबेड्यावर दारूभट्टी वर धाड



**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या आगरगाव पारधीबेडा येथे पोलिसांनी धाड टाकली असता एक हातभट्टी चालू अवस्थेत मिळाली.एक महिला ही दारू काढीत असताना आढळून आली . तिचे ताब्यातून घटनास्थळी उकळता मोहा रसायन, गावठी मोहा दारू, कच्चा मोहा सडवा रसायन तसेच इतर दारू भट्टी लागणारे साहित्य असा एकूण जुमला किंमत ६१ हजार २०० रुपयाचा माल मिळून आल्याने आरोपी हिचे विरुद्ध कलम ६५ (बी )(सी )(एफ)( ई) प्रमाणे कारवाई करण्यात आली. सहायक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण (भा.पो.से)तसेच पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांचे मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक जाधव, वडतकर यांचे प्रत्यक्ष उपस्थितीत डीबी पथकचे पो.हवा चंद्रशेखर चुटे (ब .नं११) ,पो,हवा रितेश गुजर (बक्कल नंबर २९७) ,नापोशी मोहम्मद गोरवे (ब. नंबर/ १०८०,) पो.शि विश्वजीत वानखेडे (ब .नंबर /१५६२, )मपोशी सोनी राठोड( ब.नं/ १७६०), व नूतन कांबळे (ब .नं/ १६९५)यांनी सदरची कारवाई केली.

## समृद्धीवरील अपघातात देवानंद गायधनी जखमी



**पुलगाव । प्रतिनिधी**

नाचणगाव येथील देवानंद गायधनी (वय साठ वर्षे) हे मेहकर वरून समृद्धी महामार्गाने कार क्रमांक एम एच ३२ सी ५० ४२ ने पुलगावला येत असताना कारंजा व सेलू बाजार च्या दरम्यान दि.१ एप्रिल सायंकाळी साडेपाच ते पावणे सहाच्या सुमारास त्यांच्या गाडीचा समोरील टायर फुटला त्यामुळे गाडी अनियंत्रित होऊन बाजूच्या कंपाउंड धडकली यात कार मध्ये असलेले देवानंद गायधनी जखमी झाले तर गाडीमध्ये प्रवास करत असलेले उर्वरित दोघेजण बचावले. हा अपघात इतका भीषण होता की गाडीचा पूर्ण नादुरुस्त झाली. सुदैवाने मोठे संकट टळले.

## आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूट मार्च



**वरोरा । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन वरोरा अंतर्गत आज दि.०२ एप्रिल रोज मंगळवार ला रोजी अपर पोलीस अधिक्षक चंद्रपुर रिना जनबंधु , सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा नयोमी साटम यांचे उपस्थितीत आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ प्रक्रिया तसेच रमजान ईद, रामनवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सण उत्सवानिमीत्य कायदा व सुव्यवस्था अबाधित राहुन लोकसभा निवडणुक प्रक्रिया शांततेत पार पाडावी या करीता वरोरा शहरातून रूट मार्च काढण्यात आला.

असदर रूट मार्च वरोरा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पदमावार चौक, नेहरू चौक, कामगार चौक, मित्र चौक, डोगरवार चौक, नेहरू चौक, कामगार चौक, विर सावरकर चौक, महात्मा ज्योतीबा फुले चौक, परत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गाने सदर रूट मार्च काढण्यात आला. सदर रूट मार्च करीता पोलीस स्टेशन वरोरा, भद्रावती, माजरी येथील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार तसेच सि.६० पथक, आर.सी.पी पथक, सी आय एस एफ. पथक सहभागी झाले होते .

# २०६४ मतदार करणार गृहमतदान; मतदानाची गोपनीयता पाळण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ मध्ये पहिल्यांदाच, ८५ वर्षांवरील नागरिक तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या नागरिकांना गृह मतदानाची पर्यायी सोय उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार १३ - चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील एकूण १२३९ नागरिकांनी गृहमतदानाची इच्छा दर्शविली असून यात ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या १०७६ आणि दिव्यांग मतदारांची संख्या १६३ आहे. ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २२४ आणि ६३ दिव्यांग मतदार तर चिमूर मतदारसंघात ८५ वर्षांवरील ४३७ आणि १०१ दिव्यांग मतदार गृहमतदान करणार आहेत. या मतदारांनी गृहमतदाना करीता आवश्यक असलेला फॉर्म १२ - डी प्रशासनाकडे सुपुर्द केला आहे.

आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, पात्र असलेला एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा प्रशासन विविध उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करीत आहे. भारत निवडणूक आयोगाने सुद्धा पहिल्यांदाच ८५ वर्षांवरील नागरीक आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या दिव्यांग बांधवांना गृहमतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे इच्छुक मतदारांना नमुना १२ - डी देण्यात आला. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या १०७६ तर ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या मतदारांची संख्या १६३ आहे.विधानसभा मतदारसंघनिहाय गृह मतदान करणारे मतदार : राजूरा विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील ३२५ आणि दिव्यांग २१ मतदार, चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील १७५ आणि दिव्यांग १६, बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील १९७ आणि दिव्यांग ५६, वरोरा विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २१३ आणि दिव्यांग ३९ मतदार गृहमतदानाद्वारे मतदान करणार आहेत. तर गडचिरोली लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या ब्रम्हपूरी विधानसभा मतदारसंघातील ८५ वर्षांवरील २२४ आणि ६३ दिव्यांग मतदार तर चिमूर मतदारसंघातील ८५ वर्षांवरील ४३७ आणि १०१ दिव्यांग मतदार गृहमतदानाद्वारे मतदान करणार आहेत.मतदानाची गोपनीयता पाळण्याच्या सुचना : गृहमतदानासंदर्भात अधिकारी व कर्मचा-यांचे प्रशिक्षण नुकतेच नियोजन भवन येथे घेण्यात आले. यात फॉर्म १३ - ए (डिक्लरेशन), फॉर्म १३ - बी (कव्हर ए लिफाफा), फॉर्म १३ - सी (कव्हर बी लिफाफा) आणि फॉर्म १३ - डी (मतदान कसे करायचे याबाबत सुचना) आदी प्रक्रियेबाबत अधिकारी व कर्मचा-यांना माहिती देण्यात आली. अतिशय अचूक पध्दतीने गृह मतदानाची प्रक्रिया पार पाडायची असून त्याची गोपनीयता सुद्धा पाळणे आवश्यक असल्याचे प्रशिक्षणामध्ये सांगण्यात आले. प्रशिक्षणाला अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, अजय चरडे, रविंद्र माने आदी उपस्थित होते.अशी राहील प्रक्रिया : गृहमतदानासाठी घरी जाणा-या अधिकारी व कर्मचा-यांनी डिक्लेरेशन म्हणजे फॉर्म १३ - ए अचूक भरून घ्यावयाचे आहे. मतदान केलेल्या पत्रिकेची उभी घडी करून सदर पत्रिका छोटा लिफाफा म्हणजे फॉर्म १३ - बी मध्ये टाकावा. डिक्लरेशन आणि छोटा लिफाफा दोन्ही कव्हर बी लिफाफा म्हणजेच फॉर्म १३ - सी मध्ये टाकावा. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान गृह मतदानाची व्हीडीयोग्राफी करण्यात येणार असून दोन अधिकारी / कर्मचारी, मायक्रो निरीक्षक आणि व्हीडीओग्राफर सोबत राहणार आहे.

# नरेंद्र मोदी पंतप्रधान व्हावेच:पण आम्हाला वाळीत टाकले तर वेगळी भूमिका घेऊ

## अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांचा इशारा

**धुळे**–धुळे लोकसभा मतदार संघात भाजप उमेदवार डॉक्टर सुभाष भामरे यांना स्थानिक पदाधिकाऱ्याच्या कडव्या विरोधाला सामोरे जावे लागत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्यापुढे भामरे यांच्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत. पण महायुतीत आम्हाला वाळीत टाकले जात असेल तर आम्ही निश्चितच वेगळी भूमिका घेऊ, असे या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे. यामुळे धुळ्यात भाजप उमेदवाराची अडचण वाढली आहे.

मंत्री अनिल पाटील यांच्या उपस्थितीत सोमवारी धुळ्यात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची आढावा बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत महायुतीतील विसंवाद उजेडात आला. अनेक कार्यकर्त्यांनी भाजप उमेदवार डॉक्टर सुभाष भामरे यांच्या प्रचारात सहभागी होण्यास स्पष्ट नकार दिला. आम्हाला महायुतीच्या कार्यक्रमांत डावलले जाते. खासदार पत्र देऊनही आमची कामे रद्द करतात. स्वतःचे महत्त्व टिकवण्यासाठी आमच्याकडे दुर्लक्ष केले जाते. नरेंद्र मोदी पंतप्रधान व्हावेतच. पण महायुतीत आम्हाला वाळीत टाकले जात असेल तर वेगळी भूमिका घ्यावी लागेल, असा संतप्त सूर यावेळी कार्यकर्त्यांनी अनिल पाटील यांच्यापुढे आळवला.काही कार्यकर्त्यांनी अक्कलपाडा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरावा व लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळावे, आम्हालाही विचारात घेतले जावे अशी भूमिका मांडली. भाजपच्या शहर व ग्रामीण पदाधिकाऱ्यांबाबतही यावेळी तक्रार करण्यात आली.यावेळी अनिल पाटील यांनी कार्यकर्त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण कार्यकर्ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. खासदार सुभाष भामरे यांना सलग तिसऱ्यांदा उमेदवारी दिल्यामुळे भाजपच्या अनेक इच्छुक उमेदवारांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यांनीही भामरे यांच्या उमेदवारीला कडाडून विरोध केला आहे. त्यानंतर आता त्यांना मित्र पक्षांच्या कार्यकर्त्यांकडूनही विरोधाला सामोरे जावे लागत आहेत. यामुळे महायुतीत सर्वकाही आलबेल नसल्याचे स्पष्ट दिसत आहे.डॉक्टर सुभाष भामरे यांनी १९९५ साली राजकारणात प्रवेश केला. काँग्रेस, शिवसेना व शेवटी भाजप असा त्यांचा प्रवास आहे. २००४ मध्ये त्यांनी धुळे शहर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. पण त्यांचा अवघ्या ५ हजार मतांनी पराभव झाला. २०१४ साली भाजपने त्यांना धुळे लोकसभा मतदारसंघातून रिंगणात उतरवले. या निवडणुकीत सुभाष भामरे यांनी काँग्रेसच्या अमरिश पटेल यांचा तब्बल पावणे ५ लाखांच्या मताधिक्याने पराभव केला. त्यानंतर मोदी सरकारमध्ये त्यांची संरक्षण राज्यमंत्रीपदी वर्णी लागली. डॉक्टर भामरे हे संरक्षण खात्याचा कारभार हाताळणारे महाराष्ट्रातील चौथे नेते ठरले. विशेषतः पहिल्या फटक्यात खासदारकी अन् मंत्रिपद असा अनोखा विक्रमही त्यांच्या नावावर जमा झाला.डॉक्टर सुभाष भामरे हे ११ व्या संसदरत्न पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. ५४३ खासदारांमधून सर्वाधिक प्रश्न विचारणे व विविध विषयांच्या चर्चांमध्ये सहभागी होत उत्कृष्ट कामगिरी दाखवल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. पुलवामा हल्ल्यानंतर भारतीय वायूदलाने बालाकोटमध्ये केलेल्या एअर स्ट्राईकच्या निर्णयांमध्ये सुभाष भामरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## संगमनेर तालुक्यात १७ गावे व ५२ वाड्यावस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा

**अहमदनगर**–संगमनेर तालुक्यामध्ये पाणीटंचाई सुरू झाली आहे. सध्या पंचायत समितीमार्फत १७ गावांना व ५२ वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती टंचाई विभागाचे प्रमुख संजय अरगडे यांनी दिली. मागील वर्षाच्या तुलनेमध्ये अल्प पाऊस पडल्यामुळे तालुक्याला भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. जनावराच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला. त्यातच लोकसभेच्या निवडणुकीची आचारसहिता जाहीर झाल्याने शासकीय अधिकाऱ्यांना निवडणुकीच्या कामकाजाकडे लक्ष द्यावे लागणार आहे.

निळवंडे उजव्या व डाव्या कालव्यातून सुमारे चार टीएमसीहून अधिक पाणी सोडण्यात आले होते. त्यामुळे पाटालगतच्या गावांमध्ये विहिरीतील पाण्याची पातळी वाढली होती. मात्र आता ती खाली जाऊ लागल्याने सर्वच ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. निळवंडे कालव्यातून पुन्हा शेतीसाठी पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे. मात्र, वितरण प्रणाली अद्यापपर्यंत नसल्यामुळे अनेक गावांना पाण्यापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यात पाटातून मोठ्या प्रमाणावर पाझर होत असल्यामुळे पाटाला लायनिंग अस्तरीकरणचे कामे काही ठिकाणी सुरू करण्यात आले आहे.संगमनेर तालुक्यामध्ये यावर्षी ६६ गावे टंचाईची घोषित करण्यात आली. मात्र सध्या १७ गावांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यानंतर मागणीनुसार इतर गावांना पाणीपुरवठा केला जाणार आहे. तालुक्यातील पानोडी, कुंभारवाडी, खरशिंदे, सोनुशी, सायखिंडी, खंडेरायवाडी, हिवरगाव पठार, कर्जुले पठार, गुंजाळवाडी पठार, पोखरी बाळेश्वर, माळेगाव पठार, चिकणी, पिंपळगाव देपा, डोळसणे, शेंडेवाडी, बिरेवाडी आदी गावांना तसेच हजारवाडी, कणसेवाडी, गावठाण, ठाकरवाडी, रहाटे वस्ती, गिते वस्ती, सानप वस्ती, कारवाडी, म्हसोबावस्ती, गाळ वस्ती, पांढरी बोराडे वस्ती पांढरी, दत्तवाडी, मोठेबाबा वाडी, नन्नवरे वस्ती, उपळी ठाकरवाडी, सुतारवाडी, पायरवाडी, गिरेवाडी, दगडसोंड वाडी, पठारवाडी, कोळेवाडी आदी वाडी-वस्तीवर टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे.सध्या तरी या गावांना पाणीपुरवठा होत असला तरी येत्या काही दिवसात अनेक गावांना टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. अनेक ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करावा लागणार आहे. संगमनेर खुर्द येथे गोड पाण्याच्या दोन विहिरी अधिग्रहण केल्या आहेत. औरंगपूर येथे खासगी विहीर अधिग्रहित केली. जांबुत बुद्रूक येथे बोअरवेल अधिग्रहण केला. तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार असून ज्या ठिकाणी पाहणी अंती दीड किलोमीटरच्या परिसरामध्ये पाण्याचा स्रोत आढळल्यास तो अधिग्रहण करण्यात येणार आहे. जेथे स्रोत कोरडे असतील, तेथे टँकरने पाणीपुरवठा केला जाणार असल्याची माहिती टंचाई विभागाकडून देण्यात आली. प्रांताधिकारी शैलेश हिंगे परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत.

# गुरूजी, मतदान करणे गरजेचे आहे काहो?

**शास्त्रज्ञ मंडळी आयुष्यभर अविश्रांत मेहनत घेऊन संशोधनाद्वारे मानवी जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करीत असतात. देशातील युवक-युवती सैन्यात विविध पदांवर कार्यरत राहून देशसेवा करतात. संरक्षण, संशोधन, कृषी विकास, उद्योग, याच बरोबर अगदी राष्ट्रीय सेवा दलाच्या व शालेय विद्यार्थी एनसीसी. माध्यमातून का असेना प्रत्येकजण आप-आपल्या परीने देशसेवा करण्याचा प्रयत्न करीत असतो. मतदान करणे सुद्धा देशसेवेचाच एक भाग आहे. लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते. याच दृष्टीकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राथम्याने बजावणे नितांत गरजेचे आहे. किंबहूना मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मतदारांना मतदानास प्रोत्साहित करणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख आपल्या सेवत... संपादक.**

मतदानाचे महत्व- मी एकट्याने मतदान केलं नाही तर काय फरक पडणार आहे? मतदानानिमित्त सुट्टी आहे ना? मग आपण या सुट्टीचा खुप आनंद उपभोगुया, कुठेतरी सहलीला जाउया, महाराष्ट्र दर्शनला जाऊ चला...! हे विचार म्हणजे नाकर्तेपणाचा कळस होतात. पण थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एका-एका मतानेच मतांचा डोंगर उभा राहतो. यामुळे प्रत्येक व्यक्तीने मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावण्याबरोबरच लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी, नको असलेले सरकार उलथून टाकण्यासाठी, विकास पुरुषास पुढे आणण्यासाठी, आपल्या मनातील सरकार खेचून आणण्यासाठी, आपली प्रगती वेगाने साधण्यासाठी आदी अपेक्षांना मूर्तरुप देण्याकरिता आपलाही खारीचा वाटा उपयुक्त होतो, ही बाब गांभिर्याने लक्षात घ्यायला हवी. अभी नही तो कभी नही; फिर पस्तावे की न आवे बारी! असे लक्षात घ्यावे.

दरवर्षी १५ ऑगस्ट- स्वातंत्र्यदिन, २६ जानेवारी- प्रजासत्ताक दिन आणि १ मे- महाराष्ट्र दिन या दिवशी प्रत्येक भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती ओसंडून वाहते. याचपद्धतीने ध्वजदिन निधी संकलनासही जनता सढळहस्ते मदत करते. नैसर्गिक आपत्ती असो किंवा युद्धजन्य परिस्थिती, प्रत्येक भारतीय नागरिक देशप्रेमाने भारावून जाऊन मदतीसाठी पुढे सरसावतो व आपल्या परिस्थितीनुसार मदत करतो. तद्वतच मतदानाबाबतही लोकांच्या मनात अशी कर्तव्यभावना चेतविण्याची नितांत गरज आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. सर्वच जिल्ह्यात या विशेष दिनानिमित्त २० जानेवारीपासून जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रत्येक तालुकास्तरावर तसेच जिल्ह्यातील मोठ्या लोकसंख्येच्या गावात प्रभातफेरी आयोजन, जिल्ह्यातील विविध महाविद्यालये व ज्युनियर कॉलेज मधून युवक-युवतींसाठी मतदान करणे का गरजेचे या विषयावर प्रबोधन करणारी व्याख्याने, निबंध स्पर्धा, शाहीरांच्या पोवाड्यातून जनजागरण आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

विशेषत: १८ वर्षे पूर्ण केलेल्या युवक-युवतींना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे, या अनुषंगाने मतदान जागृती बाबत तरूणाईला जास्तीत जास्त प्रोत्साहित करण्यावर भर दिला जाणार आहे. यंदाच्या २०२४च्या वर्षी आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे भारत निवडणूक आयोगाने निवडणूकीसाठी कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गाला मतदान करण्याच्या किंवा त्यांनी मतदानाचा हक्क बजवावा या प्रक्रीयेत शंभर टक्के सहभागी करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असणाऱ्या सर्वांना टपाल मत पत्रिका, निवडणूक कार्य प्रमाणपत्र यांच्या सहाय्याने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. यापूर्वी निवडणूक प्रक्रियेत गुंतल्यामुळे बहुतांशी अधिकारी व कर्मचारी मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

रहात असायचे, पण आता यंदाच्या निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

बहुतेक सर्व मतदारांना मतदान ओळखपत्रे देण्यात आली आहेत. दुबार मतदार नोंदणी झालेल्यांची नावे वगळण्याची व उर्वरित मतदारांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही जिल्हा प्रशासनाच्या वतीने युद्धपातळीवर सुरू आहे. तसेच तरूण मतदारांना मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी इंटरनेटच्या, फेसबूक व व्हॉटस्अप सारख्या सोशल मीडियाचाही मोठ्या प्रमाणात वापर करण्याचे निवडणूक विभागाचे नियोजन आहे. या निमित्त २० जानेवारी ते २५ जानेवारी २०२४पर्यंत सर्व जिल्ह्यात मतदार जागृती सप्ताह आयोजित केला गेला आहे. मतदारांनी भविष्य काळात येणाऱ्या निवडणूकीमध्ये आपल्या मतदानाचा हक्क बजावून एक सार्वभौम शक्तीशाली लोकशाही राष्ट्र उभारण्यास आपले मतदानाच्या स्वरूपात सहकार्य लाभावे हीच छोटीशी अपेक्षा. शास्त्रज्ञ मंडळी आयुष्यभर अविश्रांत मेहनत घेऊन संशोधनाद्वारे मानवी जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करीत असतात. देशातील युवक-युवती सैन्यात विविध पदांवर कार्यरत राहून देशसेवा करतात. संरक्षण, संशोधन, कृषी विकास, उद्योग, याच बरोबर अगदी राष्ट्रीय सेवा दलाच्या व शालेय विद्यार्थी एनसीसी. माध्यमातून का असेना प्रत्येकजण आपआपल्या परीने देशसेवा करण्याचा प्रयत्न करीत असतो. मतदान करणे सुद्धा देशसेवेचाच एक भाग आहे. लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते. याच दृष्टीकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राथम्याने बजावणे नितांत गरजेचे आहे. किंबहूना मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. चला तर मग, कंबर कसून दृढ निश्चयाने मतदान करण्यास तयार राहू या! !! मी यावेळी मतदान करणार म्हणजे करणारच !!




# परमानंद तिराणिक यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्रदान

**वरोरा । प्रतिनिधी**

पुरस्काराचे शतक गाठनारे आचार्य परमानंद तिराणिक कलाशिक्षक यांना यावर्षीचा जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडलाच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्य विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या मधुरम सभागृहात नागपुर येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषणपपुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्काराचे स्वरूप सम्मान चिन्ह, सन्मापत्र,आंबेडकरवादी साहित्यपग्रंथ, व पुष्पगुच्छ या स्वरुपाचे होते.पुरस्कार सोहल्याप्रसंगी मंचावर महामंडलाचे अध्यक्ष डॉ. दिपककुमार खोबरागड़े नाटककार डॉ.सुनील रामटेके, छत्रपति संबाजी नगर,मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. वैशाली प्रदान, कादबकार विद्याधर



बंसोड,प्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंबोरे, महामंडलाचे सचिव डॉ.रविन्द्र तिरपुड़े, कायदेविविषयक सल्लागार एड.भूपेश पाटील,यांची उपस्थिति होती. तसेच विविध क्षेत्रात लिखान करणारया लेखकांना व उल्लेखनीय काम करणारयाना राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देउन त्यांचाही सत्कार करण्यात आला.

आचार्य परमानंद तिराणिक कलाशिक्षक यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची उद्देशिका हि पन्नास पैशाच्या लाखो पोस्ट कार्ड वर स्वहस्तक्षरात लिहुन त्यानी जनजागृति केली. तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.शहरी भागातील मुलापेक्षा ग्रामीण भागातील वंचित घटकातील मुले अधिक मागे राहु नये म्हणून त्यानी त्यांच्यासाठी विशेष कलावर्ग घेऊन निशुल्क प्रशिक्षण वर्ग दिले.त्यांच्या कलेला जगतिक बाजारपेठ मिलावी म्हणून प्रत्येक विद्यापीठामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये वारली चित्रकला व आदिवासी बांबू कला यविषयी जनजागृति केली. अशा विविध माध्यमातून समाजप्रबोधनाचे ते कार्य करित आहे. त्यांना आतापर्यंत शेकडो पुरस्काराने सम्मानित करण्यात केल्याबद्दल अनेक मान्यवरानी शुभेच्छा पत्रांचा वर्षाव केला आहे.त्यांचे मित्रमंडली प्रवीण कापसे कलाशीक्षक,अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी मंडली,विदर्भ साहित्य संघाचे सर्व सदस्य मंडली व कला क्षेत्रतील दिग्गजानी अभिनंदन केले आहे.

# आचारसंहितेत अडकले साड्यांचे वाटप

## आनंदाचा शिधा व पिशव्या सुध्दा मिळेना

**सिंदीरेल्वे । प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकीसाठी १६ मार्चपासून आचारसंहिता लागू झाली करण्यात आली आणि त्यामुळे स्वस्त धान्य दुकानातून ज्या पात्र कार्डधारक महिलांना नि:शुल्क साड्या दिल्या जाणार होत्या त्यांचे वाटप होऊ शकले नाही.तसेच दहा किलो धान्य नेता येईल अशा अनेक पिशव्या आणि काही लोकांना आनंदाचा शिधा देखील मिळाला नाही.

या शहरात सहा रेशन दुकान आहेत.प्रत्येक दुकानात किमान ४०० ग्राहक आहेत.दर महिन्याला येथे साधारणतः १५ तारखेनंतर धान्याचे वितरण केल्या जाते.मार्च महिन्यात आचारसंहिता लागू झाल्यामुळे अनेकांनी तातडीने धान्य वाटप केले त्यात गरिबांना काही प्रमाणात रेशन सोबत साड्या मिळाल्यात पण प्रशासनाकडून पिशव्यांचा पुरवठा झालाच नाही.त्यामुळे पिशव्या मिळाल्या नाहीत.धान्य दिले मात्र आचारसंहितेच्या नावाखाली प्रत्येक दुकानदार विहित मुदतीनंतर साड्या देऊ शकले नाहीत.

पिशव्यांवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र असल्यामुळे हजारों पिशव्यांचे वितरण थांबविण्यात आल्याचे तालुका वितरण विभागाचे म्हणणे पडते.हिच बाब आनंदाच्या शिध्याचे पिशवीवर मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्याचे फोटो असल्याने अडचणीची ठरली आहे.छ.शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त दिला जाणारा आनंदाचा शिधा किटचे वाटप करतांना जे ग्राहक बाहेरगावी गेले होतेत्यांना शिध्याची किट मिळाली नाही असे सांगण्यात आले आहे.या नादात शहरातील ९१ महिलांना साड्या आणि ३४ कार्डधारकांना आनंदाचा शिधा मिळाला नाही हे येथे उल्लेखनीय.

# पूर्ण ब्रम्ह श्री श्री हरिचंद ठाकूर यांच्या जयंती साठी चंद्रपूरातील हजारो भाविक पश्चिम बंगालला रवाना

## आमदार किशोर जोरगेवार यांनी रेल्वे स्थानकावर घेतली भाविकांची भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बंगाली समाजाचे भगवान पुर्ण ब्रम्ह श्री श्री हरिचंद ठाकुर यांच्या जयंती उत्सवनिमित्त चंद्रपूरातुन हजारो भाविक बश्चिम बंगालकडे रवाना झाले आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर रेल्वे स्थानकावर सर्व भाविकांची भेट घेत त्यांना रवाना केले. तसेच पुर्ण ब्रम्ह श्री श्री हरिचंद ठाकूर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

श्री श्री हरिचंद ठाकूर हे अविभाजित बंगालमधील अस्पृश्यांच्या उत्थानासाठी त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी ओळखले जातात. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दीनदुबळ्यांच्या उद्धारासाठी समर्पित केले. ६ एप्रिलला त्यांची जयंती त्यांची कर्मभूमी असलेल्या पश्चिम बंगालच्या ठाकूर वाडी येथे साजरी केली जाणार आहे. यासाठी देशभरातून



भाविक मोठ्या संख्येने ठाकुर वाडी येथे दाखल होत आहे. चंद्रपूरातूनही मोठ्या संख्येने भाविक येथे पोहचत आहे. दरम्यान येथे पोहचण्यासाठी रेल्वे स्थानकावर भाविक एकत्रीत आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी भाविकांची भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्यात. आमदार किशोर जोरगेवार त्यांच्या भेटीसाठी रेल्वे स्थानकावर पोहचल्याने भाविकांमध्ये उत्साह दिसून आला. यावेळी शेकडो भाविकांची उपस्थिती होती.

## आठवडाभरात १३ अट्टल गुन्हेगारांवर तडीपारची कारवाई

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पोलिसांची धडक मोहीम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यात शांतता अबाधित राखण्यासाठी पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शनात पोलिस विभागाने सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाईची धडक मोहीम हाती घेतली आहे. या अनुषंगाने पोलिसांनी आठवडाभरात १३ अट्टल गुन्हेगारांवर तडीपारची कारवाई केली आहे.

पोलिस अधिक्षक सुदर्शन यांनी अट्टल गुन्हेगारांवर तडीपारची कारवाई करण्यासंदर्भात आदेश पारीत करताच शुभम अमर समूद (वय २६), रा. पंचशील वॉर्ड चंद्रपूर, शाहरुख नुरखा पठाण (वय २९), रा. अष्टभुजा वॉर्ड, जयश्री लॉन जवळ चंद्रपूर, नैनेश उर्फ लाला नितीन शहा (वय ३१), रा. लुंबिनी नगर, बाबुपेठ वॉर्ड चंद्रपूर, मोहन केशव कुचनकर (वय २५), रा. चिचघर ले-आऊट वरोरा, दर्शन उर्फ बापू अशोक तेलंग (वय २२), रा. मौलाना आझाद वॉर्ड बल्लारपूर, मुनीर खान वहिद खान पठाण (वय ५५), रा. शिवनगर नागभीड, शिवशाम उर्फ भिस्सु दामोदर भुर्रे (वय २५), रा. हनुमान नगर, ब्रम्हपूरी यांना कलम ५६ (१)(अ)(ब) मपोका अन्वये सहा महिन्याकरीता चंद्रपूर जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे.तर आठवडाभरात आतापर्यंत एकूण १३ गुन्हेगारांवर तडीपारची कारवाई करण्यात आली असून यात वरील सात गुन्हेगार आणि अरविंद बापुजी उरकुडे (वय ४५), रा. अमराई वॉर्ड घुग्घुस, प्रताप रमेश सिंग (वय २६), रा. अमराई वॉर्ड घुग्घुस, श्यामबाबू चंद्रपाल यादव (वय २९) रा. रयतवारी कॉलरी, चंद्रपूर, राजेश मुन्ना सरकार (वय ४७), रा. इंडस्ट्रीय वॉर्ड, बंगाली कॅम्प चंद्रपूर, संतोष उर्फ विक्की भास्कर दुसाने (वय ३०), रा. सिस्टर कॉलनी चंद्रपूर, अरबाज जावेद कुरेशी (वय २६), रा. हवेली गॉर्डन चंद्रपूर यांना कलम ५६ (१)(अ)(ब) मपोका अन्वये ६ महिने व १ वर्षाकरीता चंद्रपूर जिल्ह्यातून तडीपार केले आहे.सदर कारवाई पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी नाओमी साटम (वरोरा), सुधाकर यादव (चंद्रपूर), दीपक साखरे (राजुरा), दिनकर ठोसरे (ब्रम्हपूरी), स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक महेश कोंडावार, पोलिस निरीक्षक आसिफराजा (बल्लारपूर), अनिल जिट्टावार (ब्रम्हपूरी), विजय राठोड (नागभीड), सुनील गाडे (रामनगर, चंद्रपूर) आणि श्याम सोनटक्के (घुग्घुस) यांच्यावतीने करण्यात आली आहे.

# शंकरपूर येथे पोलिसांचा रूट मार्च



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर हे गाव अतिशय संवेदनशील समजल्या जात असून निवडणुकीच्या काळात शांतता राहावी, या दृष्टीने शंकरपूर मध्ये ३१ मार्च रोज रविवारला सायंकाळी सहा वाजता पोलिसांतर्फे गावात रूट मार्च काढण्यात आला.

निवडणुकीच्या काळामध्ये गावामध्ये शांतता राहावी, कोणतीही अप्रिय घटना घडू नये, यासाठी भिशी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रमीज मुलानी यांच्या नेतृत्वात शंकरपूर पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक रवींद्र वाघ तसेच पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांनी गावातील मुख्य मार्गाने रूट मार्च काढून शांततेचा संदेश दिला.

# द्राक्षाला प्रतिकिलोला ३० ते ४० रु. भाव

# निसर्गाची साथ, गुववत्ता,चवीमुळे निर्यातीला वाव

**पंढरपूर**-मागील तीन वर्षे अवकाळीचे संकट त्यामुळे द्राक्ष पिकावर झालेला विपरित परिणाम त्यातून पडलेले बाजार भाव यामुळे गत दोन वर्षात द्राक्ष उत्पादक शेतकरी तोट्यात आला होता. दोन वर्षांपूर्वी द्राक्ष काढून बांधावर फेकावी लागली. गतवर्षी २० ते २५ रुपये दर मिळाला. त्यात शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागला. यंदा मात्र नैसर्गिक संकट आले नाही, पूरक वातावरणामुळे द्राक्षांची गुणवत्ता वाढली. या द्राक्षाला निर्यातीसाठी मागणी वाढली त्यामुळे शेतातून प्रतिकिलो ३० ते ४० रुपये दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना फायदा होत आहे. द्राक्षाची निर्यातही वाढली आहे.

सोलापूर जिल्ह्यात सुमारे २१ हजार हेक्टर क्षेत्रावर द्राक्षांचे उत्पादन घेतले जात आहे. यामध्ये पंढरपूर तालुक्यात सर्वाधिक ८ हजार ७९५ हेक्टर द्राक्ष बागा आहेत. त्यापैकी कासेगाव परिसरात ३ हजार ४०० हेक्टर द्राक्ष शेतीचे क्षेत्र आहे. मागील तीन वर्षे द्राक्षांचे जास्त उत्पादन, शिवाय नैसर्गिक संकट यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आला होता. परंतु यंदा शेतकऱ्यांनी द्राक्षांचा हंगाम धरताना बाजार पेठेचा अंदाज घेऊन बहर धरला. छाटण्या विभागून केल्या. परिणामी बाजारातील आवक मर्यादित राहिली. त्यामुळे हंगामाच्या सुरुवातीपासून दर स्थिर राहिले. तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे यांनी सांगितले की, तालुक्यात ३ लाख ३० हजार टन द्राक्षांचे उत्पादन अपेक्षित असून यातून ८५० ते ९०० कोटी रुपये मिळतील. यंदा द्राक्षांची युरोपासह चीन, तैवान, रशिया, इंडोनेशिया, मलेशियाला द्राक्षांची निर्यात झालेली आहे. तर निर्यातक्षम द्राक्षांना ८० ते ९१ रुपये प्रतिकिलो दर मिळालेला आहे. पंढरपूर तालुक्यात द्राक्ष शेती हा रोजगाराचे सर्वात मोठे साधन बनलेला आहे, तालुक्यातील गावोगावी परप्रांतीय तसेच महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार या भागातील हजारो मजूर येत आहेत. शेजारच्या मंगळवेढा, सांगोला या तालुक्यातूनही शेकडो महिला, पुरुष मजूर आले आहेत.

# पंकजा मुंडे खासदार म्हणून दिल्लीत जातील, तेव्हा जानकरही सोबत असतील

## देवेंद्र फडणवीसांचा विश्वास, जानकरांचा अर्ज दाखल

**परभणी (वृत्तसंस्था)**

पंकजा मुंडे खासदार म्हणून दिल्लीत जातील तेव्हा त्यांच्यासोबत महादेव जानकर हे देखील असतील, अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा मुंडे आणि महादेव जानकर यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला. महायुतीमध्ये परभणी लोकसभा मतदारसंघाची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटली असून या पक्षाच्या कोट्यातून राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महादेव जानकर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत देवेंद्र फडणवीस बोलत होते. या सभेला महायुतीतील नेत्यांची प्रमुख उपस्थिती होती. जानकर यांचा अर्ज भरताना जोरदार शक्तिप्रदर्शन केले. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजप नेत्या पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, बबनराव लोणीकर, मेघणा बोर्डीकर, राजेश विटेकर अशा महायुतीतील प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती.या वेळी ४१ पेक्षा जास्त खासदार महाराष्ट्रातून निवडून येतील - देवेंद्र फडणवीसनव्या लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महादेव जानकर यांची संसदेत प्रतीक्षा करणार आहे. त्यामुळे आता महादेव जानकर यांना थेट दिल्लीला पाठवायची जबाबदारी, ही परभणीकरांची असल्याचे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. मूर्ती लहान पण किर्ती महान, असे महादेव जानकर यांचे व्यक्तिमत्व असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना असेल किंवा अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल तसेच नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपची ताकद असेल. हे सर्व महादेव जानकर यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे



असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मागील लोकसभा निवडणुकीत ४१ खासदार महाराष्ट्रातून मोदीजींच्या नेतृत्वात निवडून आले आहेत. यावेळी त्यापेक्षा जास्त खासदार महाराष्ट्रातून निवडून येतील, असा दावा फडणवीस यांनी केला आहे. महादेव जानकर माझ्या मंत्रिमंडळात मंत्री होते पण पाच वर्षात एक रुपयांचा डाग देखील महादेव जानकर यांच्यावर लागला नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.पंकजा मुंडे या खासदार म्हणून दिल्लीत जाणार आहेत आणि मुंडे यांच्याबरोबर महादेव जानकर देखील खासदार म्हणून दिल्लीत जातील, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा मुंडे यांच्या विजयाचा विश्वास देखील व्यक्त केला. बीड लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महादेव जानकर यांचा अर्ज भरताना आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत पंकजा मुंडे आणि देवेंद्र फडणवीस एकाच मंचावर दिसून आले. या वेळी देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा मुंडे यांचा उल्लेख करत त्या विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला.मागील दहा वर्षात आपण जे पाहिले तो केवळ ट्रेलर आहे. पुढच्या पाच वर्षात खूप मोठ्या प्रमाणात कामे होणार असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. पुढील पाच वर्षात महाराष्ट्र आणि देश प्रगतीच्या वाटेवर जाणार असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. नागपूर ते गोवा असा शक्तीपीठ महामार्गाचा उल्लेख करत हा महामार्ग परभणीच्या विकासाचा मार्ग खुला करेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या महामार्गाला जोडूनच आम्ही उद्योग क्लस्टर तयार करणार असल्याचे देखील देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. समृद्धी महामार्गामुळे पंधरा जिल्ह्यांना समृद्धी मिळाली तसेच शक्तिपीठ महामार्गामुळे पर्यटन, कृषी आणि उद्योग क्षेत्राला मोठे योगदान मिळणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. या माध्यमातून परभणी जिल्हा हा दक्षिण भारत आणि पश्चिम महाराष्ट्राला वेगाने जोडला जाईल आणि त्यातून विकासाच्या संधी वेगाने तयार होणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. या महामार्गाच्या माध्यमातून विकासाची नवी संधी परभणी जिल्ह्याला मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले.या आधीच्या खासदारांसाठी आम्हीच मते मागितले होती. मात्र, त्यानंतर ते दिल्लीला आणि मतदारसंघाला देखील विसरून गेले. मात्र, महादेव जानकर हे कर्ज रूपाने नागरिकांचे मते मागत आहेत. महादेव जानकर हे विकासाच्या व्याजासह तुमचे कर्ज परतफेड करतील, असा दावा देखील देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. महादेव जानकर यांना मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिलेला मत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.ही निवडणूक देशाचे भवितव्य ठरवणारी असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. परभणीची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेसची होती. आम्ही देखील बहुजनांचे प्रतिनिधित्व करणारे लोक आहोत. त्यामुळे ही जागा महादेव जानकर यांना देण्यात आली असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. ज्यांना तुम्ही निवडून दिले, त्यांनी दहा वर्षात काय दिवे लावले? असा प्रश्न विचारत अजित पवार यांनी संजय जाधव यांच्यावर निशाणा साधला. लोकसभा निवडणुकीसाठी परभणी मतदार संघातून अनेक जण इच्छुक होते. इच्छा असणे हे वाईट नाही. तो त्यांचा हक्क आहे. मात्र, एकदा घेतलेला निर्णय सर्वांनी मान्य केला. याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या सर्वांना ही निवडणूक स्वतःची समजून लढवावी लागणार आहे. महादेव जानकर हे सर्वसामान्यांचा विचार करणारे नेते असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. महायुतीच्या माध्यमातून परभणीचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी अजित पवार यांनी दिले.महादेव जानकर यांना स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी मुलगा मानले होते. महादेव जानकर यांना प्रॉपर्टी नाही पण राजकीय वारसा गोपीनाथ मुंडे यांच्याकडून मिळाला असल्याचे यावेळी पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. महादेव जानकर हे निष्कलंक व्यक्तिमत्व आहे. कोणाच्याही पाच पैशांचे मिंदे ते नसल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी सर्वसामान्य माणसाच्या विकासासाठी महादेव जानकर यांना विजयी करण्याचे आवाहन पंकजा मुंडे यांनी केली आहे. विकासाचे काम करण्यासाठी अनेक शक्ती आज एकत्र आल्या आहेत. महादेव जानकर हे कुठेही, कसेही, कोणत्याही चिन्हावर उभे राहिले असते, तरी मी त्यांच्या प्रचारासाठी गेले असते, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी जानकर यांना विकासासाठी विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले आहे. महादेव जानकर यांना आपल्याला दिल्लीत पाठवायचे असल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

# अशोक चव्हाणांची स्वतःची ओळख काय?:त्यांनी काँग्रेसच्या भरवशावर मालमत्ता कमावली-नाना पटोले

**मुंबई (वृत्तसंस्था)**-भाजप खासदार अशोक चव्हाण यांची स्वतःची ओळख काहीच नाही. त्यांनी केवळ काँग्रेसच्या भरवशावर मालमत्ता कमावण्याचे काम केले, अशी तिखट टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरुवारी अशोक चव्हाण यांच्यावर निशाणा साधताना केली आहे.

अशोक चव्हाण यांनी नुकतीच काँग्रेसला राज्यात कुणीही विचारत नसल्याची टीका केली होती. त्यांच्या या टीकेला नाना पटोले यांनी जशासतसे प्रत्युत्तर दिले. महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात काम करणारा मोठा वर्ग आहे. महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप अंतिम झाले नाही. त्यांनी प्रकाश आंबेडकरांना चांगले वागवले नाही. यामुळे ते नाराज झाले. काँग्रेसवर इतर घटकपक्षही नाराज आहेत. यामुळे काँग्रेसची फरफट सुरू आहे. विशेषतः काँग्रेसच्या राज्यातील विद्यमान नेतृत्वामुळे काँग्रेसवर ही वेळ आली आहे, असे चव्हाण म्हणाले होते.नाना पटोले यांनी अशोक चव्हाण यांच्या या टीकेचा चोख समाचार घेतला. भाजपचे नेते भ्रष्टाचारी नेत्यांसाठी आपली कवाडे खुली असल्याचे सांगतात. अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या भरवशावर मालमत्ता कमावली. भ्रष्टाचार केले. सत्ता उपभोगली. आता ते भाजपत गेले. अशोक चव्हाण यांची स्वतःची ओळख काय? त्यांच्या मतदार संघातही त्यांची स्थिती चांगली नाही. त्यामुळे काँग्रेसवर टीका करण्यापेक्षा त्यांनी स्वतःचे पहावे. काँग्रेसवर बोलू नये, असे नाना



पटोले म्हणाले.नाना पटोले यांनी यावेळी काँग्रेस विदर्भातील पहिल्या टप्प्यातील लोकसभेच्या पाचही जागा जिंकणार असल्याचाही दावा केला. काँग्रेस योग्य वेळेची वाट पाहत आहे. आम्ही ४ दिवसांत प्रकाश आंबेडकरांना योग्य ते उत्तर देऊ. आजपासून काँग्रेसचा पहिल्या टप्प्यातील प्रचार सुरू झाला आहे. पहिल्या टप्प्यातील पाचही जागा काँग्रेस जिंकेल असे आजचे चित्र आहे, असे नाना पटोले म्हणाले.माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वीच काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर भाजपने तत्काळी त्यांनाी राज्यसभेवर पाठवले होते. त्यानंतर आता ते लोकसभा निवडणुकीच्या तयारीला लागलेत. पण त्यांना मराठा आंदोलकांचा तीव्र विरोध होताना दिसून येत आहे. भाजपचे नांदेडचे उमदेवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारासाठी ते सोमवारी एका गावात गेले असता तिथे त्यांची गाडी अडवण्यात आली. यामुळे त्यांना प्रचार न करताच आल्यापावली परत फिरावे लागले.

# महायुतीतील विविध पक्षातील छोट्या-मोठ्या चुका दुरुस्त केल्या जातील-चंद्रकांत पाटील

**पुणे**-राज्यात २० पक्ष महायुतीत असले तरी सर्वांना लोकसभा निवडणुक लढण्याची संधी मिळू शकली नाही. तीन प्रमुख पक्ष व रासप हे या निवडणुकीत लढत असून त्यांचे जे चिन्ह असेल त्यानुसार सर्व पक्ष महायुतीतील उमेदवारांचा प्रचार करतील. निवडणुकीस आणखी मोठ कालावधी असून विविध पक्षातील छोट्या-मोठ्या चुका दुरुस्त केल्या जातील, असे मत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना चाकण येथे व्यक्त केले. यावेळी माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, भाजप जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, प्रवक्ते संदीप खर्डेकर उपस्थित होते. शिरुर लोकसभा मतदारसंघाची महायुतीची समन्वय बैठक चाकण येथे पार पडल्यानंतर ते बोलत होते.पाटील म्हणाले, देशभरातील ५७२ जागांवर पक्षाने लक्ष्य केंद्रित केले असून तीन लोकसभा मतदारसंघात मिळून एक क्लस्टर प्रमुख भाजपने नियुक्त केला आहे. महाराष्ट्र मध्ये अशाप्रकारे ४८ जागांवर १६ जणांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्राचे प्रभारीसोबत क्लस्टर प्रमुखांची बैठक पार पडली आहे. कल्स्टर प्रमुख यांनी महायुती मधील २० पक्षांतील नेते, कार्यकर्त्यांची व्यवस्थित मोट बांधण्याचे काम करावयाचे आहे. विविध पक्षात योग्य संवाद निर्माण करून उमेदवारांचे मतदानाचे मार्जिन वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.सर्वांनी मिळून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान पदावर विराजमान करण्याचा आनंद त्यातून मिळणार आहे. त्यादृष्टीने बारामती मतदारसंघाची यापूर्वी बैठक केली आहे. त्यानंतर पुणे शहरात विधानसभा मतदारसंघनिहाय एकत्रित बैठक पार पाडली. शिरुर उमेदवार ठरल्यावर आज याबाबत आढावा बैठक घेण्यात आली आहे. महायुती मधील पक्षांचा समन्वय वाढवणे , सर्वांची ताकद मतदानास लागावी,पक्षातील रुसवे-फुगवे संपवावेत यासाठी ही बैठक होती. एका घरात चार रक्ताची नाती सुध्दा यांच्यात देखील कुरबुर सुरु असते. कुटुंब प्रमुख याची ही कुरबुर कमी करण्याचे काम असते. वेगवेगळ्या पक्षातील कार्यकर्ते, धोरणे त्यामुळे थोड्याफार प्रमाणात नाराजी नाट्य चालणार.

# पिंपरी चिंचवड येथील रेश्मा पिंताबर विभुते यांना 'बेस्ट मेकअप आर्टिस्ट अवॉर्ड' ने सन्मानित

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र ब्युटिशियन क्लब मुंबई आयोजित आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नुकतेच शो २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. या शोमध्ये पिंपरी चिंचवड (नवी सांगवी) येथील रेश्मा पिंताबर विभुते यांना 'बेस्ट मेकअप आर्टिस्ट अवॉर्ड' ने सन्मानित करण्यात आल्याने परिसरातून अभिनंदन होत आहे.

नवी मुंबई वाशी येथील महात्मा फुले स्मृती भवन मध्ये नुकतेच महाराष्ट्र ब्युटिशन क्लब , मुंबई आयोजित आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अवॉर्ड शो २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील अनेक भागातून मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. दरम्यान बेस्ट मेकअप आर्टिस्ट अवॉर्ड २०२३ साठीचा अभिनेत्री अमृता धोंगडे व



महाराष्ट्र क्लबचे विजय तालोली यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड सांगवी येथील रेश्मा पिंताबर विभुते यांचा ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन उचित असा सन्मान करण्यात आला.यावेळी सेलिब्रिटी आर्टिस्ट नीलिमा पंडित ,आयबीएस फोटोग्राफी टीम परिमल पंडित यासह अन्य मान्यवरांसह वेगळ्या वेगळ्या जिल्ह्यातून ब्युटीशियन आणि मेकअप आर्टिस्ट सह सुमारे दोनशे महिला उपस्थित होत्या. दरम्यान विभुते यांच्या या सन्मानाबद्दल नगरसेविका श्वेता गलांडे , महिला मंच्याच्या अश्विनी झगडे यांनी अभिनंदन केले.

# राज्यातील एक हजार २३९ गावांमध्ये टँकर

**सोलापूर :** राज्यातील धरणांनी तळ गाठला असून धरणांमधील पाणीसाठा सरासरी ३० टक्क्यांवर आहे. जमिनीची पाणीपातळी खालावल्याने अनेक गावे, वाड्या-वस्त्यांवरील हातपंप बंद पडले असून ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या विहिरींमधील पाणी खोलवर गेले आहे. या पार्श्वभूमीवर टँकरची मागणी वाढत असून सध्या राज्यातील १५ जिल्ह्यांमधील एक हजार २३९ गावांसह दोन हजार ७७९ वाड्या-वस्त्यांना एक हजार ५३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

रायगड जिल्ह्यात १३, पालघरमध्ये १३, धुळ्यात पाच, जळगाव जिल्ह्यात ५३, सोलापूर जिल्ह्यात ३८, अमरावतीत एक, बुलढाण्यात २७ टँकर सुरु आहेत. मागील आठवड्याच्या तुलनेत ८४ गावे आणि २०९ वाड्यांवर टँकर सुरु झाले आहेत. सध्या सुरु असलेल्या एक हजार ५३२ टँकरमध्ये



साडेचौदाशे टँकर खासगी आहेत. गतवर्षी १ एप्रिल रोजी राज्यातील अवघ्या ५९ गावांमध्ये ६८ टँकर सुरु होते. यंदा मात्र साडेबाराशे गावांमध्ये साडेपंधराशेपर्यंत टँकर सुरु असल्याची वस्तुस्थिती आहे.राज्यातील दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढत आहे. दररोज टँकरची मागणी वाढत असून यंदाच्या दुष्काळात १५ हजार टँकर सुरु होतील, असा अंदाज आहे. शासनाकडून त्यासाठी १०० कोटींचा निधी दिल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली.राज्यातील नगर जिल्ह्यातील १०४ गावे व ५२९ वाड्यांना १०३ टँकर, पुणे जिल्ह्यातील ३९ गावे व ३५२ वाड्यांवर ७१, सातारा जिल्ह्यातील १४२ गावे आणि ५३१ वाड्यांवर १४९ टँकर, सांगलीतील ७४ गावे व ५३१ वाड्यांवर ७७, छत्रपती संभाजीनगरातील २३९ गावे आणि ४९ वाड्यांवर सर्वाधिक ३८४, जालन्यातील २२७ गावे व ७३ वाड्यांवर २७१ आणि बीड जिल्ह्यातील १०६ गावे आणि ६९ वाड्यांवर ११९ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. दर आठवड्याला सुमारे १५ ते २० गावे व तेवढ्या वाड्यांवर टँकरची मागणी होत आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेला मोठा धक्का

## माढा लोकसभा संपर्क प्रमुखांचा पक्षाला रामराम

**माढा :** देशभरात निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. अशातच घडामोडींना वेग आला आहे. नाराज नेते बंडखोरी करत पक्षांतर करत असल्याचे चित्र आहे. याचा फटका अनेक पक्षांना बसत आहे. अशातच चर्चेत आलेल्या माढा लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे.माढा लोकसभा संपर्क प्रमुख संजय कोकाटे यांनी शिवसेना शिंदे गटाला रामराम केला आहे. संजय कोकाटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे.संजय कोकाटे हे आपल्या शेकडो समर्थकांसब मुंबईत शुक्रवारी शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. माढ्याचे



अजित पवार गटाचे आमदार बबन शिंदे यांच्या विरोधात कोकाटेंनी शड्डू ठोकला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर घडामोडींना वेग आला आहे.

## मिरज -सोलापूर हायवेवर अपघात

# ऊस तोडणी करून गावाकडे परतणाऱ्या कामगारांच्या ट्रॅक्टरला ट्रकने उडवले; ४ ठार, १० गंभीर जखमी

**सोलापूर (वृत्तसंस्था)**-मिरज - सोलापूर हायवेवर ट्रकने ऊसतोड कामगारांना दिलेल्या धडकेत ४ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर १० जण गंभीर जखमी झालेत. हे कामगार ऊसतोडणीचे काम संपवून घराकडे परतत होते. तेव्हा ट्रकने त्यांना जोराची धडक दिली. मृतांपैकी ३ जण चिखलगीचे, तर १ जण शिरनांदगीचा रहिवाशी आहे.यासंबंधीच्या वृत्तानुसार, ही घटना नागपूर -रत्नागिरी महामार्गावरील कवठेमहांकाळ तालुक्यातील नागज फाट्याजवळ सोमवारी मध्यरात्री २ च्या सुमारास घडली. मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागात रोजगाराचे कोणतेही साधन



नाही. त्यामुळे येथील बहुतांश नागरीक ऊसतोड करून आपला उदरनिर्वाह करतात. त्यासाठी या नागरिकांना सांगली, सातारा, कोल्हापूर आदी ठिकाणी जावे लागते. येथील काही ऊसतोड कामगार ऊसतोडणीसाठी गुरुदत्त सहकारी साखर कारखाना शिरोळ येथे गेले होते. यंदाचा गळीत हंगाम संपवून काही मजूर गावाकडे जात होते. सोमवारी मध्यरात्री २ च्या सुमारास त्यांच्या ट्रॅक्टरमध्ये बिघाड झाला. त्यामुळे ट्रॅक्टर रस्त्याच्या बाजूला उभे करून दुरुस्त केला जात होता. तेवढ्यात पाठीमागून येणाऱ्या आंध्र प्रदेशातील एका ट्रकने त्यांना जोराची धडक दिली.या अपघातात शालन दत्तात्रय खांडेकर (३०, रा. शिरनांदगी), जगमा तम्मा हेगडे (३५), दादा आप्पा ऐवळे (१७), निलाबाई परशुराम ऐवळे, (रा. चिक्कलगी) यांचा जागीच मृत्यू झाला, तर १० जण गंभीर जखमी झाले. या अपघाताचे माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना लगतच्या कवठमहांकाळ व मिरज येथील रुग्णालयात हलवले. या दुर्घटनेमुळे चिक्कलगी व शिरनांदगी गावावर शोककळा पसरली आहे.

# वणी येथे पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक संपन्न

# विकासाच्या लाटेवर स्वार व्हा प्रगतीचे भागिदार बना-मुनगंटीवार

**वणी । प्रतिनिधी**

विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात भारत देश उत्तरोत्तर प्रगती करीत आहे. पुढील पाच वर्षात विकासाचा वेग आणखी वाढणार असून विकासाच्या या लाटेवर स्वार होण्यासाठी आणि प्रगतीचे भागिदार बनण्यासाठी विकासालाच मतदान करा, असे आवाहन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघाचे भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

वणी तालुक्यातील नायगांव बुज. येथील ग्राम पंचायतच्या पटांगणात आयोजित पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीला ते संबोधित करीत होते. वणीचे विद्यार्थी मोठमोठ्या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करीत असतात. अनेकांना संशोधन करण्याची इच्छा आहे. त्यांना त्यांच्या गावातच सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अत्याधुनिक वाचनालय






बांधण्यात येईल. त्याचा लाभ शेजारच्या गावातील विद्यार्थ्यांना देखील होणार असून त्यांचेही जीवनमान उंचावेल, असा विश्वास सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.मोफत अन्न धान्य योजना, घरकुल योजना, आयुष्यमान भारत अशा विविध योजनांच्या माध्यमातून सामान्य लोकांचे जीवन सुकर झाल्याचे सांगत त्यांनी कोव्हिडमध्ये अनाथ मुलांसाठी राबविलेल्या विविध योजनांचा उल्लेख केला. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविल्याचे सांगत त्यांनी फिरत्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सामान्य लोकांपर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या सोडविण्यावर भर देत असल्याचे सांगितले.

## सुधीर मुनगंटीवार यांना प.पुज्य.शेषराव महाराज व्यसनमुक्ती संघटना जिल्हा चंद्रपूरचा पाठिंबा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प.पुज्य.शेषराव महाराज व्यसनमुक्ती संघटना जिल्हा चंद्रपूरच्या वतीने ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या उमेदवारीला संपूर्ण पाठिंबा दिला असून ही संघटना संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात सुधीर मुनगंटीवार यांच्या विजया करिता काम करणार आहे.

प.पुज्य शेषराव महाराज व्यसनमुक्ती संघटना हि २५ ते ३० वर्षापासून दारू व्यसनमुक्ती वर कार्यरत असून या संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात लाखोच्या संख्येने दारू व्यसनाच्या आहारी गेलेल्या लोकांना व्यसनमुक्त केले आहे. या संघटनेच्या कार्यात ना. सुधीर मुनगंटीवार यांनी नेहमी मोलाचे योगदान दिले असून दारू व्यसनमुक्तीच्या प्रत्येक कार्यात सहभाग नोंदवून हे कार्य व्यसनाच्या आहारी गेलेल्या समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे चंद्रपूर जिल्ह्यात दारू व्यसन मुक्त समाज कसा करता येईल यासाठी या संघटनेच्या माध्यमातून कार्यरत होते. चंद्रपूर जिल्ह्यातील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या एकमताने बैठक बोलावून ना. सुधीर मुनगंटीवार यांना आज (मंगळवारला )झालेल्या बैठकीत एकमताने पाठिंबा द्यायचे



ठरवले तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील व्यसनमुक्त परिवार व नातेसंबंध इत्यादी लोकांपर्यंत जाऊन ना.सुधीर मुनगंटीवार यांना प्रचंड बहुमताने विजय करायचं असे बैठकीदरम्यान विश्वासाने ठरविण्यात आले.

या बैठकीला संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत धानोरकर, संघटनेचे जिल्हा संघटक दिगंबर वासेकर,संघटनेचे जिल्हा सचिव अविनाश राऊत, संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष आकाश श्रीरसागर, संघटनेचे पोभूर्ना तालुका अध्यक्ष मारुती वाकूलकर, संघटनेचे वरोरा तालुका अध्यक्ष महादेव मांडवकर, संघटनेचे राजुरा तालुकाध्यक्ष भोजराज एकोंनकर,संघटनेचे चंद्रपूर तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण पिंपळकर, संघटनेचे मूल तालुकाध्यक्ष दीपक ठाकरे, प्रकाश अल्गमकर तसेच शसाईनाथ कुंनघाटकर,राजू लडके,राजू धुमने सरपंच,सुरज बोंडे,सुमित वासाडे,देवराव चौधरी,किशोर पारखी, मंगेश वडसकर, ढोले,निकेश सुरजागडे,नामदेव ढवस,सुरेश मेश्राम,बंडू येलमुले,अनिल कुसराम,प्रदीप जवादे,अशोक मंडवागडे,कुषाब इत्यादी शेकडोच्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## गुलाब टेंभुर्णे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील जीवनापूर येथील सामाजिक कार्यकर्ते व कवी, गुलाब टेंभुर्णे यांना महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत, साहित्यिक, भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस (पुणे) यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त विदर्भ हिन्दी साहित्य संमेलन, मधुरम सभागृह, सीताबर्डी, नागपूर येथे पुरस्कार वितरण व सत्कार समारंभ दि. ३१ मार्च २०२४ रोजी डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेत पार पडला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान मिलिंद महाविद्यालय (छत्रपती संभाजीनगर) , डॉ. सुनील रामटेके(मुंबई) , डॉ. विद्याधर बन्सोड(चंद्रपूर) डॉ. रवींद्र तिरपुडे (नागपूर) ॲड. भूपेश पाटील आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. सदर पुरस्कार गुलाब टेंभुर्णे यांच्या सामाजिक तथा साहित्य क्षेत्रातील



योगदानाबद्दल देण्यात आला. बुद्ध, फुले,शाहू,आंबेडकर तथा अनेक महापुरुषांच्या विचाराचा प्रचार, प्रसार करण्यासाठी कार्यक्रमाच्या माध्यमातून निरंतर सक्रिय कार्य करीत आहेत व प्रासंगिक कवितांच्या माध्यमातून जागृतीचे निरंतर प्रयत्न करीत असतात. यापूर्वी सामाजिक जाणिवेतून जीवनापूर येथील बौद्ध समाज व जोशाबा ग्रुप तर्फे सन २०२३ मध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला होता. सध्या ते आंबेडकरी विचारवंत, साहित्यिक 'योगिराज वाघमारे' यांच्या कादंबऱ्यांवर गोंडवाना विद्यापीठात सरदार पटेल महाविद्यालय, संशोधन केंद्र,चंद्रपूर येथे डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन (पी.एच.डी) करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक स्तरातून अभिनंदनाचा आणि कौतुकांचा वर्षाव होत आहे.



**नागभीड बस्थानकसमोर एका घरच्या झाडाखाली इवलेसे छोटे दोन माकड आपसात खेळताना आपल्या मातेसोबत. आपण छोटेसे...बहीण- भाऊ..उदयाला मोठाले होऊ... हे गीत गात तर नसावेत ना? छाया :प्रणय बांगरे.**

## श्री एकनाथी भागवत ज्ञान यज्ञ व सामुहिक सोहळा संपन्न

### सदगुरू शेषानंद पांडे महाराज यांची पावन उपस्थिती

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

आदिनाथ गुरू माऊली सेवा मडंळ, चिंधीचक आयोजित श्री एकनाथ महाराज षष्ठी ,व जगद्गुरू तुकाराम महाराज बिज,छत्रपती शिवाजी महाराज जयंती प्रित्यर्थ श्री एकनाथी भागवत ज्ञान यज्ञ व सामुहिक विवाह सोहळा मोठ्या भक्तीमय वातावरनात संपन्न झाला. या प्रसंगी श्री ब्रम्हमुर्ती शेषानंद बाबा कृपाप्रसादिक श्री ओमप्रकाश पांडे महाराज भद्रावती यांच्या अखंड ब्रम्हवानीतुन श्री एकनाथी भागवत प्रवचन पार पडले. या प्रसंगी महाराजानी सामुहिक विवाह ही आजची काळाची गरज आहे गेला २१ वर्षा पासुन या ठिकानी विवाह सोहळ्याचे आयोजन ब्रम्हमुर्ती शेषानंद



बाबा यांच्या मार्गदर्शना व्दारे संपन्न होत आहे. या वेळी शेक़डो भाविकानी वधु वराना आशिर्वाद दिला.

घटस्थापना- प्रभाकर राऊत,शालिक उईके, श्री हरीपाठ - रविन्द्रजी गाडगे सहत्रनामजप- श्रीकृष्ण खामनकर,पुजाराम खिरटकर गोवर्धन पुजा- देवरावजी किगरे,अनिलजी खामनकर सामुदायीक प्रार्थना- रतन जांभुळे, चिंतन - अनिल खामनकर,हर्षल कुकडे,किसन वरवाडे ग्रामगिता प्रवचन-सुनिल उमरे,गजानन कुमरे,राजुजी मेघरे,सुनिता कारेकार महीला सम्मेलन- गुरूआई मंदा पांडे ग्रामगिताचार्य बेबी पिपळशेन्डे, ममता पांडे,वैशाली निखाडे,देवका कुकडे,सुनंदा खिरटकर,

दहीहाडी- नबाबसिंग ठाकुर,भागवत ग्रंथ पुजा - विवेक नन्हे कालाकिर्तन - पाडुरंग लांबट यांनी केले.कार्यक्रमाला यशस्वी करन्यासाठी आदिनाथ गुरू माऊली सेवा मंडळ चिंधीचक यांनी अथक परीश्रम केले.

## साईबाबा पालखी पायी वारकऱ्यांच्या आगमनानिमित्त विविध कार्यक्रम

**पुलगाव । प्रतिनिधी**

साईबाबा चॅरिटेबल ट्रस्ट नागपूरच्या वतीने नागपूर ते शिर्डी साईबाबा पालखी यात्रा पायी वारी दरवर्षी जात असते. गेल्या १७ वर्षांपासून हा उपक्रम सुरु आहे.या यात्रेचे सोमवार, १ एप्रिल रोजी पुलगाव शहरात आगमन झाले. यावेळी दणदणीत स्वागत करण्यात आले व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. वर्धा येथून निघालेली साई पालखी सोमवारी सायंकाळी पुलगाव शहरात दाखल झाली.

कॅम्प रोडवर पालखीचे मान्यवर मंडळीनी स्वागत केले. साई पालखी उत्सव समिती एकता चौक व बि.सी.एन. नेटवर्क पुलगावच्या वतीने श्री साई भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .नागपूर येथील कलावंत भूषण गुप्ता व निकीता साहू साई भजन सादर केले .यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.येथे महाआरती करण्यात आली.महाआरती आटोपल्यानंतर साईप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पालखीच्या आगमनाप्रसंगी प्रमुख मार्गावर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती . त्यांच्याकरिता जागोजागी खाद्यपदार्थ व



शीतपेय वितरणाचे स्टॉल्स भाविकांतर्फे लावण्यात आले. साई पालखी सोबत देवळी येथील महाकाल ढोल ताशा पथक, वरुड येथील वारकरी दिंडी पथक यांचे विशेष आकर्षण होते. त्याचप्रमाणे भजन दिंड्यानी साई नामाचा गजर केला होता.साई पालखी नगर परिषद, आठवडी बाजार, भगतसिंह चौक, गांधी चौक,स्टेशन चौक, नाचनगाव रोड मार्गाने हरीराम नगर येथे साई मंदिरात पादुका पुजन व आरती करण्यात आली.येथून रात्री १० वाजता साईधाम मंदिर येथे पोहोचली. तेथे आरती व प्रसाद वितरण करण्यात आले. भाविकांनी साई पालखीचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत व पुजन केले.

## भाजप सरपंचासह ३५ कार्यकर्त्यांचा कॉंग्रेसमध्ये प्रवेश



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर विधानसभा क्षेत्रातील जामगाव येथील ऐन निवडणुकीच्या तोंडावर सरपंच प्रेमीला ढगे व अनेक कार्यकर्त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश घेतला.

देशात चाललेल्या वाढत्या महागाईमुळे जनता हैराण झाली आहे. सरकार शेतकरी शेतमजुरांचे प्रश्न सोडवू शकत नाही. अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी तसेच गरीब लोकांना न्याय मिळू शकत नाही. या दहा वर्षांमध्ये चिमूर विधानसभेचा विकास स्थानिक आमदार करू शकले नाहीत. त्यामुळे त्या कार्यकर्त्यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस नेतृत्व सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर विश्वास ठेवून चिमूर विधानसभा क्षेत्राचे समन्वयक तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. सतीश वारजुकर यांच्या नेतृत्वावावर विश्वास ठेवून त्यांनी शंकरपूरचे सरपंच तथा महासचिव महाराष्ट्र प्रदेश युवक कांग्रेस कमिटी साईश वारजुकर यांच्या हस्ते दुपट्टा घालून कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला.त्यात विद्यमान सरपंच प्रमिला ढगे, माजी सरपंच भगवान बोबडे, सुरेश सारई, सविता साळवी, तुळसाबाई नन्नावरे, शांताबाई सारई, वामन मून, उमा मून, भाऊराव नन्नावरे, सुमित्रा नन्नावरे, अशोक डांगे, वर्षा डांगे, गोलू डांगे, रामचंद्रजी ढगे, माधव गायकवाड, शत्रुघ्न कोटनाके, सुनिता कोटनाके, केशव कोटनाके, लीला कोटनाके सुभाष कोटनाके, हिरामण मुन, सुमित्रा मून, बालाजी खाडे, वंदना खाडे, गोलू मालके, सचिन बोरकर, राज कमल सारई नरेश श्रीराम, प्रवीण गायकवाड, अमोल गायकवाड, रमेश सारई, सारई विनोद जांबुडे भारत बोबडे अधिक कार्यकर्त्यांनी प्रवेश घेतला. या वेळी भिसी शहर अध्यक्ष शुभम गिरडे, मनोज दिघोरे, सुनिल अध्यक्ष मच्छीमार सोसायटी भिसी मेश्राम, आनंद निमजे, सोज्वल डुकरे, किशोर शिवरकर, राहुल दिघोरे, आकाश हजारे, अमन मेश्राम तसेच कॉंग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .